# प्रेसनोट

जा.क्र. ०७/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:–०३/०१/२०१७

पोस्टे भंडारा येथे दिनांक २२+२३/०१/२०१६ चे रात्र दर. फिर्यादी राजु शंकर हेडावु वय ४४ वर्ष, रा. राम मंदीर वार्ड भंडारा यांचे राहते घराचा समोरील दाराचा कोंडा तोडुन आत प्रवेश करुन कोणीतरी अज्ञात चोराने लोखंडी आलमारीतील सोन्याचे दागीने व नगदी रुपये असा एकुण ६१,६००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वर पो. स्टे भंडारा येथे अज्ञात आरोपीताविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला.

घटणेची माहीती प्राप्त होताच पो. स्टे. भंडारा येथील डि. बी. पथकातील अधिकारी व कर्मचारी हे घटनास्थळी जावुन फिर्यादीस भेटुन विचारपुस करुन लगेच आरोपीचा व चोरी गेलेल्या सोन्याचा दागीण्यांचा शोध घेण्याकरीता पो. स्टे. हद्दीत रवाना होवुन व गुप्त्बातमीदारांना तात्काळ माहीती देवुन संपुर्ण शहरात गुप्तबातमीदारांचे जाळे पसरवुन डि. बी. पथकाने तपासाची चक्रे गतीने फिरवुन गुन्हयातील आरोपी हे भंडारा शहर सोडुन पडुन जाण्याचे बेतात असतांना आरोपींना मोठा बाजार भंडारा येथुन गुन्हा दाखल झाल्यानंतर फक्त ३ तासामध्ये शिताफीने पकडण्यात आले. आरोपीकडुन गुन्हयात चोरीस गेलेले सोन्याचे दागीने कि. ६१,६००/–रु. चा माल हस्तगत करण्यात आला आहे.

सदर संपुर्ण कार्यवाही मा. विनीता साहु पोलीस अधिक्षक सा. भंडारा तसेच मा. रश्मी नांदेडकर, अप्पर पोलीस अधिक्षक सा. भंडारा, मा. श्री. संजय जोगदंड उपविभागीय पोलीस अधिकारी सा. भंडारा, मा. जयवंत चव्हान पपोलीस निरीक्षक सा. पोलीस स्टेशन भंडारा यांचे मार्गदर्शनाखाली डि. बी. पथकातील पो. उप.नि. संदीपान उबाळे, पो. हवा. पुरुषोत्तम शेंडे, भोगे, सुभाष राठोड, पो. ना प्रशांत गुरव, दिनेश गलुले, पो. शि. रमेश बेदरकर, विजय तायडे, (डि. बी) पो. स्टे. भंडारा यांनी पार पाडली.

करीता सदर ची माहीती वर्तमान पत्रामध्ये प्रकाशित होणेस विनंती आहे.

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

**(बी. आर. गाडे)**
**प्रभारी पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**
**दुरध्वनी.क्र. ८८०५१०१११२**

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.